TATA ETHICAL FUND

(An Open-ended Equity Scheme)

TATA MUTUAL FUND

Expertise that's trusted



# ‘‘मी किती शिकलो इतकेच मी कसे शिकलो हे देखील महत्त्वाचे आहे.‘‘

हे उत्पादन अशी अपेक्षा असलेल्या गुंतवणूकदारांसाठी योग्य आहे# :

- दीर्घकालीन भांडवल वृद्धी
- शरियाहची पूर्तता करणाऱ्या कंपन्यांच्या इक्विटी आणि इक्विटीशी संबंधित इन्स्ट्रुमेन्टसमध्ये आणि शरियाह तत्वांमध्ये परवानगी असलेल्या इन्स्ट्रुमेन्टसमध्ये गुंतवणूक.
- ह्या योजनेचे **उच्च जोखीम** ■ **(तपकिरी)** असे वर्गिकरण करण्यात आले आहे. त्यांच्या मुद्दलाला उच्च जोखीम आहे हे गुंतवणूकदारांना हे माहित आहे.

**#हे उत्पादन त्यांच्यासाठी योग्य आहे का ह्याबद्दल शंका असल्यास गुंतवणूकदारांनी त्यांच्या आर्थिक सल्लागाराचा सल्ला घ्यावा.**

**टीप:** जोखमीचे स्वरूप अशा प्रकारे दाखविले जाते:

(तपकिरी) गुंतवणूकदारांना माहिती असते की त्यांच्या भांडवलाला उच्च जोखीम आहे.

(पिवळा) गुंतवणूकदारांना माहिती असते की त्यांच्या भांडवलाला मध्यम जोखीम आहे.

(निळा) गुंतवणूकदारांना माहिती असते की त्यांच्या भांडवलाला कमी जोखीम आहे.

**म्युच्युअल फंडातील गुंतवणूक बाजारपेठेतील जोखमींच्या अधीन आहेत, योजनेशी संबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचा.**

## गुंतवणुकीची तत्वप्रणाली

टाटा एथिकल फंड हा वैविध्यपूर्ण इक्विटी फंड असून शरीयाहच्या तत्वांची पूर्तता करणाऱ्या स्टॉक्समध्ये गुंतवणूक करणे हे ह्या गुंतवणुकीचे उद्दिष्ट आहे. गुंतवणुकीच्या बाबतीत शरियाहच्या तत्वांचा पाठपुरावा करणाऱ्या कंपन्यांचा पोर्टफोलिओ तयार करताना स्टॉक्सची निवड करताना ह्या फंडात खालून वर असा दृष्टीकोन अवलंबला जातो. टाटा एथिकल फंडात नैतिक बाबतीत कमतरता असलेल्या गटातील कंपन्यांमध्ये गुंतवणूक करण्यास मनाई असते उदा. तंबाखू, अल्कोहोल, सट्टा, लॉटरी, बँकिंग व फायनान्स सेवा आणि इतर प्रतिबंधक कंपन्या.

## शरियाह गुंतवणूक

**शरियाह काय आहे?**

शरियाह ही इस्लामची नैतिक मूल्यांची संहिता आणि धार्मिक कायदा आहे. शरियाह मध्ये निधर्मी कायद्याने अनेक विषय हाताळण्यात आले आहेत ज्यात गुन्हे, राजकारण आणि अर्थशास्त्र, त्याचप्रमाणे व्यक्तिगत गोष्टी उदा. स्वच्छता, आहार, प्रार्थना आणि उपास वगैरे यांचा समावेश आहे. शरियाहच्या तत्वांनुसार ठराविक नियमांवर गुंतवणूक आधारित असावी लागते आणि त्यात सार्वजनिक गरजा, व्यवसायातील योग्यता, आणि मिळकतीचा नैतिक स्त्रोत अशा चाळण्या लावल्या जातात.

**शरियाह वर आधारित गुंतवणुकीची महत्त्वाची वैशिष्ट्ये:**

**सेक्टरवर आधारित चाळण्या:**

**शरियाहच्या तत्वांमध्ये ह्याच्याशी संबंधित ठराविक व्यावसायिक कामकाज वगळावे लागते:**

- अल्कोहोल, तंबाखू.
- व्याज देणे आणि स्वीकारणे ह्यासारखा व्यवसाय करणाऱ्या कंपन्या उदा. बँकिंग उद्योग.
- गेमिंग/गॅम्बलिंग/कॅसिनो/संधीचा खेळ.
- हलाल-व्यतिरिक्त अन्न उत्पादने.
- करमणूक व अश्लील साहित्य किंवा प्रौढांसाठी मसुदा असलेली करमणूक.

**आर्थिक गुणोत्तरावर आधारित चाळण्या:**

- आपल्या पुस्तकांमध्ये जास्त कर्ज असलेल्या कंपन्यांना चाळणी लावणे.
- व्याजाच्या मिळकतीसारख्या शरियाहची पूर्तता न करणाऱ्या कामकाजाद्वारे मिळकत अधिक प्रमाणात असलेल्या कंपन्या.
- रोख, थकित रक्कम, गुंतवणुका आणि कर्जदार ठराविक मर्यादेत.

## टाटा एथिकल फंड का?

**शरियाहची पूर्तता करणाऱ्या स्टॉक्सचा वैविध्य पूर्ण पोर्टफोलिओ**

- सुमारे 29 क्षेत्रातील 200 स्टॉक्सपैकी शरियाहची पूर्तता करणाऱ्या स्टॉक्सचा वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओ.
- फंडाद्वारे कोणत्याही मार्केट कॅप दृष्टीकोनाचा अवलंब केला जात नाही.
- स्टॉक्सची निवड करताना बॉटम-अप (खालून वर) पद्धती.

**कमी लिव्हरेजसह मूलत: सक्षम स्टॉक्सचा पोर्टफोलिओ**

- अशा कंपन्यांमध्ये गुंतवणूक ज्यांच्या 30% पेक्षा कमी भांडवलाची उपलब्धता व्याजासह कर्जाद्वारे करण्यात आली आहे.
- अशा कंपन्यांना साधारणपणे त्यांच्या विकासासाठी निधी पुरवठा करण्यासाठी बाहेरून कोणत्याही प्रकारे मोठ्या प्रमाणात कर्ज घ्यावे लागत नाही - उच्च अंतर्गत रोखता निर्माण करण्याची क्षमता.
- सध्याच्या बाजारपेठेतील परिस्थितीप्रमाणे बाहेरील लिक्विडिटी परिस्थिती कशीही असली तरी विकासाची क्षमता.

**मूलत: सक्षम कंपन्यांचा पोर्टफोलिओ**

पोर्टफोलिओत ह्या कंपन्यांचा समावेश होतो:

- उच्च रोखता निर्मिती करणाऱ्या.
- उच्च भांडवल कार्यक्षमता असलेल्या.
- चांगल्या मिळकतीच्या वृद्धीची शक्यता.

**शरियाह तत्वांचे काटेकोर पालन**

- शरियाहच्या तत्वांचे पालन केले जात आहे का हे तपासून पाहण्यासाठी स्वतंत्र सल्लागारांद्वारे पोर्टफोलिओचे काटेकोर परिक्षण.
- काही तफावत असल्यास ती निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत दुरूस्त केली जाते.
- प्रतिबंधित मिळकतीच्या बाबतीत शुद्धता प्रक्रिया.

## कोणी गुंतवणूक करावी व का

- शरियाहची पूर्तता करणाऱ्या इक्विटी आणि इक्विटीशी संबंधित इन्स्ट्रुमेन्टसमध्ये गुंतवणूक करण्याची इच्छा असलेले गुंतवणूकदार.
- नैतिक समजले जाणाऱ्या व्यवसायात सहभागी असलेल्या सामाजिक जबाबदारी सांभाळणाऱ्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करणारे.
- कमी लिव्हरेज आणि मूलत: सक्षम असलेल्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करण्यास प्राधान्य देणारे गुंतवणूकदार.
- दीर्घकालीन संपत्ती निर्माण करणाऱ्या गुंतवणुकीच्या संधींच्या शोधात असलेले आणि माफक ते आक्रमक जोखमीची इच्छा असलेले आणि 3 वर्ष किंवा अधिक काळ गुंतवणूक करणारे इक्विटीचे गुंतवणूकदार.

*वितरक :*